REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# " झेलझपाट : कोरकू समाजजीवनाचे चित्रण "



प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे
(एम.ए., बी.एड्, एम.फिल, पीएच.डी.)
मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय,
चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

## प्रस्तावना :

मराठी साहित्यात १९६० नंतर दलित, ग्रामिण, स्त्रीवादी साहित्य प्रवाहानंतर १९८० मध्ये आदिवासी साहित्याचा प्रवाह निर्माण झाला. दलित व ग्रामिण साहित्याच्या माध्यमातून सांस्कृतिक उद्रेक निर्माण झाल्यानंतर आदिवासी साहित्य प्रवाहाची निर्मिती झाली. स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक जागृती झाली. त्यामुळे ग्रामीण बहुजन समाजात सांस्कृतीक, वैचारीक विकासाला चालना मिळाली. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यनंतरच्या काळात मध्यमवर्गीय जाणिवेणे गांधीवाद आणि मार्क्सवादी प्रेरणेतून मराठी कादंबरी मध्ये आदिवासी जीवनाचे चित्रण दिसू लागले.

आदिवासी जीवनाचे चित्रण करण्याचा मान प्रथम र. वा. दिघे यांना मिळाला. त्यांच्या 'पाणकळा', 'सराई ', 'सोनकी' या कादंबऱ्यातून आदिवासी जीवनाचे चित्रण आलेले आहे. शं. रा. भिसे 'जंगलातील छाया' १९४५, श्रीराम अत्तरदे 'सावलीच्या उन्हात', वि. वा. हडप 'अन्नदाता उपाशी' १९४७, 'गोदाराणी' १९४७, प. त्रि. सहस्त्रबुध्दे 'पहिली सलामी' १८४८, वा. व. कर्णिक 'वाडगीन', दुर्गा भागवत 'महानंदीच्या तिरावर' १९५३, दा. गो. बोरसे 'जीभाऊ' १९५४, गो. नि. दांडेकरांच्या कादंबऱ्या, अनिल सहस्त्रबुध्दे 'डांगाणी' १९८५ इत्यादी कादंबऱ्यामधून मध्यमवर्गीय, सौदर्यावादी जाणीवेतून आदिम जमातीचे जीवन चित्रण प्रगट होते. डॉ. मधुकर वाकोडे यांनी आदिवासी मेळघाटातील कोरकू आदिवासीच्या जीवनावर 'झेलझपाटा' १९८८ मध्ये कादंबरी लिहीली आहे. या कादंबरीला १९८९ चा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार मिळाला आहे. कोरकू आदिवासी जमातीचे चित्रण झेलझपाटा या कादंबरीतून करण्यात आले आहे.

## कोरकू आदिवासी जमात :

कोरकू ही महाराष्ट्रातील एक प्रमुख आदिवासी जमात आहे. या आदिवासी साहित्याचा अभ्यास डॉ. गोविंद गारे यांनी म्हटले आहे. "महाराष्ट्राच्या उत्तरेकडील सातपुडा पर्वताच्या परिसरात निसर्गरम्य आणि नागमोडी वळणाच्या घाटांचा मेळ या प्रदेशात झाला आहे. म्हणून याला मेळघाट असे म्हटले जाते". मेळघाटातील चिखलदरा, धारणी, परतवाडा, सलोना, तारुबांदा इत्यादी ठिकाणी कोरकू जमात आढळून येते.

'कोर' म्हणजे माणूस आणि 'कू' हा प्रत्यय लावून त्याचे अनेक वचन होते. माणसाचा समूह किंवा मनुष्य जात असा 'कोरकू' या शब्दाचा अर्थ आहे.

## स्त्री व्यक्तीरेखा :

झेलझपाट या कादंबरीमध्ये एकून आठ स्त्री व्यक्तीरेखा आहे. या कादंबरीची मुख्य नायिका फुलय ही आहे. तिची आई चैतू सहनशील व पतिव्रता स्वभावा आहे. चैतूवर जंगलात अस्वलाने हल्ला केल्यामुळे त्यातच तिचे निधन झाले. त्यामुळे फुलया घरात आई

नसल्यामुळे घरातील सर्व जबाबदारी तिच्यावर येते. 'कोरकू' या जमातीचे वैशिष्टये म्हणजे या जमातीत मातृसत्ताक पध्दतीला महत्वाचे स्थान देण्यात आले आहे.

कादंबरीचा नायक 'केरुशी' याला प्रेमाचे नाते टिकविणे कठीण जाते. फुलय आणि केरु हे दोघे एकमेकांवर मनापासून प्रेम करतात. परंतू यांच्या प्रेमामध्ये कासम मण्यारीवाला अडथळा निर्माण करतो. फुलया तापट, हट्टी, स्वाभिमानी, अनुकरणशील, शीलवान, सत्वशीलपणा, हळवी, आत्मपरिक्षण करणारी, आधुनिकता व नाविन्यता जोपासण्याची कला या नायिकेत आहे. या कादंबरीत फुलयाला आधार नसल्यामुळे तिच्या जिवनाची परवड झालेली दिसून येते. कारण वडीलांनी दारुसाठी व मटणासाठी कासम मण्यारीला जवळ केले. याचा फायदा मण्यारी घेतो. वडीलांच्या लाच्यारी पोटी केरुने बोलणे बंद केले. केरु साथी असरा देवीच्या कुंडात मासे पकडण्यासाठी उडी मारतो त्यातच त्याचा अंत होतो. देवीच्या कुंडात साथी असरांनी ओढून नेले अशी कथा निर्माण झाली आहे.

पुराण कथेचे अभ्यासक दामोधर धर्मानंद कोसंबी 'साथी असरा' या बद्दलचे महत्व सांगीतले आहे. साथी असरा या मातृदेवता आहे. पुणे जिल्हातील मावळ तालुक्याच्या बाहेर साथी असरा होत्या. या देवता जलदेवता आहे. त्या त्रास देतात. या देवतांना पुरुष सहचर नाही. या मातृदेवता अविवाहीत असुन मातृदेवतांची शांती झाली नाही तर त्या मृत्यू आणण्यास कारणीभुत होतात.

स्त्री गीताची अभ्यासिका विद्या व्यवहारे म्हणतात, "मराठी लोकजीवनातील स्त्रीजीवनात साती असरांना ग्रामदेवता म्हणून वेगळे स्थान आहे. स्त्री मनाच्या धर्माला अधिक जवळच्या आहे. बालग्रहाच्या देवता म्हणून या ग्रामदेवता स्त्री जीवनाला जवळच्या वाटतात. महाराष्ट्रात व इतर प्रांतातही या जलदेवतेला महत्वाचे स्थान आहे. असरा ही बाळाची रक्षण करणारी तसेच त्यांचा घात करणारी ग्रामदेवता आहे. या कादंबरी मध्ये केरु याचा मृत्यू सात असरांमूळे होतो. याचा सहसंबंध लोकजीवनाशी कादंबरीकाराने दाखविला आहे.

### पुरुष व्यक्तीरेखा :

या कादंबरी मध्ये एकून एकोनचाळीस व्यक्तीरेखा आहे. वाचकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या व्यक्तीरेखा म्हणजे केरु, दारु व मटणासाठी लाचार होणारा, फुलयाचा घात करणारे तिचे वडील मोपा पटेल. फुलयाकडे वाईट नजनेने पाहणारा कासम मण्यारीवाला, यासारखे या कादंबरीतील पुरुष व्यक्ती रेखा या स्त्रीलंपट आहे. या कादंबरीचा नायक तुमला पटेलचा मुलगा केरु आहे. चिंचोण्याच्या आश्रम शाळेत केरुचे मॅट्रीक पर्यंत शिक्षण होते. कोरकू जमातीमधला सुशीक्षीत केरु हा माशांची शिकार करण्यात प्रविण असतो. अदिवासी सेवा सहकारी सोसायटीचा गैरप्रकार करणारा रहीम शेठ याला विरोध करणे केरुला कठीण जाते. जंगलात लागलेल्या आगीला आपण एकटे विझवू शकत नाही. स्थानिक पातळीवरच्या सावकारी प्रस्थापितांना आवरणे अवघड आहे. सोसायटीच्या प्रकरणावरुन वुईक आणि केरु मध्ये शाब्दीक बोलणे होते. त्यामुळे केरु हा अपमाणित होतो. या सर्व वातावरणामुळे केरु बेचन, हताश व उदासीनतेने ग्रस्त होतो. यामध्येच त्याच्या जीवनाचा शेवट होतो.

### समाजजीवन :

मेळघाटातील कोरकू या आदिम जमातीचे व्यक्तिगत व सामाजीक जीवनाचे चित्रण या कादंबरीतून मधुकर वाकोडे यांनी केले आहे. मातृसत्ताक कुटुंब पध्दत ही कोरकू समाजात होती. कोरकू समाजातील समस्यांचे चित्रण या कादंबरीत करण्यात आले आहे. कोरकू जमातीच सांस्कृतीक, आर्थिक जीवन, विवाहसंस्था, कुटुंब संस्था, जात पंचायत, देवदेवता, अंधश्रध्दा, शिक्षण, व्यवसाय जंगली प्राण्याची दहशद, व्यसनाधीनता, व्यापारी, सावकार या वर्गाकडून होणारे शोषण या सर्व परिस्थितीचे वास्तव चित्रण या कादंबरीच्या अभ्यासातून प्रगट होते.

### सांस्कृतीक व आर्थिक जीवन :

कोरकू समाज हा स्वतःला रावणाचे वंशज मानतात. कोरकूच्या धार्मिक, सांस्कृतीक जीवनात रावन पुत्र मेघनाथला फार महत्व आहे. कोरकू ही जमात मुंडा, कोलोरियन या जमातीची पोटशाखा आहे. मध्यभारतातील द्रावीड जमातीमध्ये तीचा समावेश होतो. होळी, फागवा, नागदेवता, सुर्य, मातामाय, लोककथा, लोकगीते या सर्वांना महत्वाचे स्थान देण्यात आले आहे.

कोरकू समाजाची आर्थिक परवड झालेली आहे. त्यामुळे त्यांना सांस्कृतीक उत्सव करण्यासाठी कष्ट करावे लागत असत. वेळप्रसंगी सावकाराकडून कर्जकाढून सण-उत्सव साजरी केल्याचा उल्लेख आलेला आहे. सावकाराचे पैसे वेळेवर देण्यात आले नाही तर त्यांना त्रास देण्यात येत असे. या सर्व दैन्य अवस्थेचे चित्रण या कादंबरीतून लेखकांने केले आहे.

**विवाहसंस्था :**

कोरकू समाजात मातृसत्ताक पध्दती असल्यामुळे या जमातीमध्ये विवाहाचे अनेक प्रकार आहे. विधवा विवाह, घरघुशी विवाह, पसंती विवाह, भागानारी विवाह, आटासाटा विवाह, मेळघाटातील कोरकू समाजामध्ये लांबजाना विवाहाला विशेष महत्व देण्यात आले आहे. कोरकू समाजाचे वैशिष्टये म्हणजे मुलीच्या वडीलांना वधूमुल्य म्हणून हुंडा दयावा लागतो. लांबजाना पध्दतीमध्ये वधूमूल्य फिटेपर्यंत मुलाला सासऱ्याकडे राहावे लागते. या कादंबरीचा नायक केरु फुलयाशी लांबजाना विवाह करु शकत नाही. फुलयाच्या वडीलांना वधूमुल्यम्हणून दारु देण्यास नकार देतो. या कादंबरीतील नायक हा वाईट गोष्टीला नकार देत असल्यामुळे त्याच्या जीवनाचा शेवट हा अपयशात होतो. हे या कादंबरीची शोकांतिका आहे.

**अंधश्रध्दा :**

या कादंबरीतून बऱ्याच पात्राच्या माध्यमातून अंधश्रध्दा दिसून येते. जंगलातील वाघापासून गाईचे संरक्षण व्हावे म्हणून गवळी व कोरकू ढाण्यातील आदिवासी वाघ देवाची पूजा करतात. त्याला प्रसंन्न करुन घेतात. ग्रामदेवतेसाठी व देवी दर्शनासाठी कोरकू ढाण्यातील कोरकू रहिम शेठ कडून व्याजाने पैसे घेतात, वल्लभदास खंडेलवालच्या दुकाणात भांडी गहाण ठेवतात, कारण देवीसाठी बकऱ्याचा बळी देण्यासाठी धडपड चालू असते. कोरकू जमातीत शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अंधश्रध्देचा प्रभाव अधिक झाल्याचा दिसून येतो.

**व्यवसाय :**

झेलझपाट मध्ये गवळी व कोरकू हे ढाण्यातील पारंपारीक व्यवसायाला महत्व देतात, जंगलातील मोहफुले गोळा करुन त्यापासून दारु बनविणे, शिकार करणे, मोलमजूरी करणे, अशा पध्दतीच्या कामाला महत्व देण्यात आल्याचे चित्रण दिसून येते.

**व्यसनाधीनता :**

झेलझपाट मधील पात्रात व्यसनाधीनचे प्रमाण दिसून येते. फुलयचे वडील मोपा पटेल, चौकीदार संपत, कसम, जैस्वाल, बी. डी. ओ., सभापती, डॉ. टिकेकर, जासो, फुलय असे स्त्री पुरुष व्यसनी असल्याचे दिसून येते.

**समारोप :**

झेलझपाट या कादंबरीतून सामाजिक चित्रण प्रगट होते त्यातून कोरकू जामातीचा जीवन संघर्ष दिसून येतो. या जमातीत शिक्षणाचा अभाव असल्यामुळे समाजामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती मोठया प्रमाणात दिसून येते. या समाजाची आर्थिक परिस्थिती चांगली नसते त्याचा गैरफायदा सावकार घेतो व त्यांची आर्थिक पिळवणूक करतो. या कदंबरीत काही वाईट प्रवृत्तीचे लोक असतात. त्यांच्या वर्चस्वाखाली सर्व समाज हा आपले जीवन जगत असतो. परिणामी त्याचे वाईट परिणाम समाजाला भोगावे लागतात.

कादंबरीतून लेखकांने केरु हा या कादंबरीचा नायक दाखविला तो थोडे फार शिक्षण घेतो. त्यामुळे या समाजात त्याचे व्यक्तीमत्व वेगळे दिसून येते, परंतु तो समाजात एकटाच पडल्याचे लेखकाने दाखविले. अंधश्रध्दा, व्यसनाधिन, कर्जबाजारी अशा अवस्थेत ही जमात जीवन जगतांना दिसून येते. दोन चार अपप्रवृत्तीचे लोक त्यांना परिवर्तन नको असत. या कादंबरीतून आदिवाशी समाज किती वाईट पध्दतीने जीवन जगतात याचे प्रत्यय या कादंबरीतून येतो.

**संदर्भसुची :**

१. महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित जमाती : डॉ. गोविंद गारे.
२. समाज प्रबोधन पत्रिका अंक : जाने-मार्च २०००.
३. पुराणकथा आणि वास्तवता : दामोधर धर्मानंद कोसंबी.
४. स्त्री गीतांची सामाजिक - सांस्कृतीक पाश्वभुमी : विद्या व्यवहारे.
५. 'वसंत' मासिक : दोन समकालीन अदिवासी कादंबऱ्या एक दृष्टीक्षेत्र.



**प्रा. डॉ. अनिता परभतराव खंडागळे**
**(एम.ए., बी.एड्, एम.फिल, पीएच.डी.)**
**मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं,), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**